"माझे शहर, माझा अभिमान"

मिरा भाईंदर महानगरपालिका

अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

जा.क्र.मनपा/अवि/ ११० /2026-27 दि. २२ / ५ /2026

प्रति,
माहिती व जनसंपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय :- धोकादायक इमारतींची जाहिर सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेबाबत.**
**संदर्भ: जा.क्र.मनपा/अवि/110/2026-27,दि.22/05/2026 रोजीची जाहिर सुचना.**

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घोषित केलेल्या धोकादायक इमारतींची संदर्भात नमुद केल्याप्रमाणे सोबत जोडलेली जाहिर सूचना नियमानुसार 2 राज्यस्तरीय व 2 स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती आहे.

सोबत : संदर्भिय धोकादायक इमारतींची जाहिर सूचना.

(नरेंद्र चव्हाण)
सहा. आयुक्त तथा
विभाग प्रमुख (अतिक्रमण निर्मुलन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग**

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८


**जा.क्र.मनपा/अवि/ ११० /2026-27** **दि. २२ / ५ /2026**

## // धोकादायक इमारतींची जाहिर सुचना//

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जुन्या/ जीर्ण व प्रथम दर्शनी धोकादायक वाटणाऱ्या इमारतींचे सर्वेक्षण सहा. आयुक्त, प्रभाग समिती कार्यालय क्र. 1 ते 6 यांच्या मार्फत करण्यात आलेले आहे. सदर इमारतींचे महानगरपालिकेच्या पॅनलवरील "स्ट्रक्चरल इंजिनियर" मार्फत संरचनात्मक करण्यात आलेली असुन, सदर इमारतींची खालील प्रवर्गात वर्गवारी करण्यात आलेली आहे.

**अ)** सी- 1 (अतिधोकादायक, राहण्या अयोगय व तात्काळ निष्कासित करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या) प्रवर्गातील

**ब)** सी 2 ए (इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरुस्ती करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या)

**क)** सी-2 बी (इमारत रिकामी न करता रचनात्मक दुरुस्ती करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या)

**ड)** सी-3 (किरकोळ दुरुस्ती प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या)

सदरच्या धोकादायक इमारतींची यादी महानगरपालिकेचे www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबंधितांनी त्याचे अवलोकन करावे.

सदर यादी मधील सी (1) प्रवर्गातील अति धोकादायक इमारतींचे भोगवटदार/ मालक यांनी तात्काळ इमारत रिक्त करून ती निष्कासित करणे आवश्यक आहे. सदरच्या अति धोकादाय इमारती कोसळून जिवित वा वित्तहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित इमारत भोगवटदार/ मालक यांची राहील, यांची नोंद घ्यावी.

तसेच सी-2 ए, सी-2 बी, सी-3 या प्रवर्गातील धोकादायक इमारत धारकांनी संरचनात्मक तपासणी अहवालात नमुद केल्याप्रमाणे इमारतींची दुरूस्ती तात्काळ करण्यात यावी.

**(नरेंद्र चव्हाण)**
**सहा. आयुक्त तथा**
**विभाग प्रमुख (अतिक्रमण निर्मुलन)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**